08-03-2024-Dai-02 NEW_DH_PAN_28_04_2016-2.qxp 3/7/2024 11:29 PM Page 1

मोरजीत डोंगरांना आग लावण्याच्या प्रकारात वाढ

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. ७ : मोरजी पंचायतक्षेत्रातील किनारी भागातील जमिनी विकून संपल्यानंतर आता शेतजमीन आणि डोंगर माळरानावर आगी लावून झाडे भस्मसात करण्याचा प्रकार घडत आहे. मोरजी पंचायतक्षेत्रातील बहुतांश डोंगर–माळरानांची विक्री झाली आहे. काही शिल्लक काजू बागायतींना आगी लावण्याचा प्रकार घडत असून याकडे पूर्णपणे प्रशासनाचे दुर्लक्ष झाले आहे. पंचायत मंडळही याकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र दिसून येते.

आता दलालांचे लक्ष डोंगर माळरानावर गेले आहे. ८० टक्के डोंगर माळरानावरील जमिनी विकत गेल्यानंतर काही ज्या शिल्लक आहेत, आणि ज्या जागेमध्ये काजू बागायती आहे, त्या माळरानावर आगी लावून खडकाळ भाग करण्याचा प्रकार सुरू आहे. प्रशासनाच्या सहकार्याने हे सर्व काम सुरू आहे. रात्री अपरात्री आगी लावल्या जातात. झाडे भस्मसात केली जातात. याविषयी कोणीही तक्रार नोंद करत नाही. कुणी आवाज उठवत नाही. त्यामुळे अशा व्यावसायिकांचे आयतेच फावते.

मोरजी : डोंगरांना आग लावण्याचा प्रकार वारंवार घडत आहे. (निवृत्ती शिरोडकर)

डोंगर माळरानावर जंगलाची तोड करून काँक्रीटची जंगले उभारण्याचा प्रयत्नसुरू आहे. प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असून व्यावसायिकांना सहकार्य करून संमती देत असल्याचे दिसून येत आहे. राजकर्त्यांच्या आशीर्वादामुळे ही डोंगर – माळराने नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री असताना रमाकांत खलप यांनी मांद्रे ,मोरजी डोंगर पठारावर इलेक्ट्रॉनिक सायबर सिटी प्रकल्प आणण्याचा प्रस्ताव ठेवला होता. त्यावेळी शेतकरी व राजकर्त्यांनी या प्रकल्पाला विरोध केला.

मोरजीतील काही सामाजिक कार्यकर्त्यांनी या डोंगर माळरानावर 'सायबर सिटी' सारखा प्रकल्प आणला गेला .तर आमची पाळीव जनावरे कुठे चरणार ? त्यांना मोकळे माळरान कुठे मिळणार ? असे प्रश्न करून या प्रकल्पाला पोडतिडकीने विरोध केला. ही माळराने आजपर्यंत सुरक्षित राहिली का? असा प्रश्न आता निर्माण होत आहे. सध्या डोंगरमाळराने स्थानिकांच्या हातात नाहीत. ती बाहेरील व्यावसायिकांच्या हातात गेलेली आहेत.

डोंगर माळरानावर मोठ्या प्रमाणात होणारे काँक्रीटचे जंगल तोडून वेगवेगळी बांधकामे उभारली जात आहेत. डोंगर माळरानावर आगी लावल्या जातात. हे एकंदरीत चित्र बघितल्यानंतर या जमिनी कोणी विकल्या. या जमिनीमागे विकण्याचे कोणाचे कटकारस्थान आहे. या जमिनी सामान्य नागरिकांनी विकल्या आहेत का? याचाही शोध घेण्याची गरज आहे.

हंसापूर येथे १६पासून पणशीकर नाट्यमहोत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. ७ : पेडण्याचे सुपुत्र नटवर्य प्रभाकर पणशीकर यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी पेडणे येथील नटवर्य प्रभाकर पणशीकर कला मंच व गोवा मराठी अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने नटवर्य प्रभाकर पणशीकर नाट्यमहोत्सवाचे दि. १६ व १७ मार्च असे दोन दिवस हा सोहळा हसापुर येथील श्री देवी सातेरी देवस्थान समिती व सातेरी कला मंदिर या संस्थेच्या सहकार्याने हा महोत्सव होणार आहे.

या महोत्सवात पणशीकर कुटुंबासोबत रंगभूमीवरील दिग्गज कलाकार व विविध संस्थाचे प्रतिनिधी या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. दि. १६ रोजी ६ वाजता पेडणेचे आमदार प्रवीण आर्लेकर यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. या सोहळ्यास गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष प्राचार्य अनिल सामंत , ज्येष्ठ अभिनेत्री जान्हवी पणशीकर, हंसापुरचे सरपंच तुळशीदास गावस, सातेरी देवस्थानचे अध्यक्ष संतोष मळीक, सातेरी कला मंदिरचे अध्यक्ष सुहास मळीक, नटवर्य प्रभाकर पणशीकर कला मंचाचे अध्यक्ष प्रवीण कोटकर, हसापुरच्या उपसरपंच रुचिरा मळीक, पंचायत सदस्य प्रज्योत मळीक, रीमा मळीक, आदी मान्यवर उपस्थित असतील. या कार्यक्रमात बापू मळीक, संतोष मळीक, अर्जुन मळीक, भदु मळीक, मनोहर मळीक, उत्तम गावस व रमेश मळीक यांचा सत्कार करण्यात येणार आहे. त्यानंतर ७ वाजता पं. जितेंद्र अभिषेकी यांनी संगीतबद्ध केलेले गोवा राज्य महिला नाट्यस्पर्धेतील तृतीय क्रमांक विजेते अभिनव कला थिएटर्स, मांद्रे प्रस्तुत व वसंत कानेटकर यांच्या लेखणीतून अजरामर झालेले पौराणिक 'संगीत मत्स्यगंधा' हे प्रशांत मांद्रेकर यानी दिग्दर्शीत केलेले नाटक सादर करण्यात येईल. दि. १७ रोजी सायंकाळी ७ वाजता रवळनाथ युनिटी स्पोर्ट्स ॲण्ड कल्चरल क्लब, हळर्ण यांनी सादर केलेले रणजीत देसाई लिखित गोवा राज्य ऐतिहासिक नाट्य स्पर्धेतील उत्तेजनार्थ प्रथम पारितोषिक विजेते ऐतिहासिक नाटक 'रामशास्त्री' सादर केले जाईल. या नाटकाचे दिग्दर्शन सौरभ कारखानीस यांनी केले आहे.

पान १ वरून

शेतकरी नेत्यांना न्यायालयाने फटकारले

शेतकऱ्यांना युद्ध करायचे आहे का? ही पंजाबची संस्कृती नाही. शेतकरी नेत्यांना अटक करून चेन्नई तुरुंगात पाठवा, असे उच्च न्यायालयाने म्हटले आहे. शेतकऱ्यांना न्यायालयात उभे राहण्याचा अधिकार नाही. शेतकरी आंदोलनाबाबत दोन राज्यांची सरकारे आपले काम करण्यात अपयशी ठरली. हरियाणा सरकारने शेतकऱ्यांच्या निदर्शनाचे अनेक फोटो उच्च न्यायालयाला दाखवले. शस्त्रे घेऊन शांततापूर्ण निदर्शने कशी होत आहेत, असा सवाल हायकोर्टाने विचारला.

बनावट दाखल्यांद्वारे विवाह नोंदणी

आहे तर हे दाखले मामलेदार कार्यालयाने दिले नसल्याचे स्पष्ट झाले आहे. यासंदर्भात सविस्तर माहिती अशी की, जिल्हा निबंधक तथा सासष्टी तालुक्याचे उपनिबंधक सूरज वेर्णेकर यांनी फातोर्डा पोलिस ठाण्यात नोंदवलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, बनावट कागदपत्रे, निवासी दाखले बनवून विवाह नोंदणी करण्यात येत असल्याचे आढळले आहे. एकाच अनुक्रमांकाचे ४ निवासी दाखले वेगवेगळ्या नावावर दिले गेले असल्याचे सापडले आहेत. गोवा ऑनलाईन पोर्टलवर पडताळणी केली असता, २०२३ साली हे निवासी दाखले दिले असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. फातोर्डा येथील निसर्ग संकुलात वास्तव्यास असलेल्या सद्दामहुसेन शहाजान कामते यांनी गुरुवारी केलेल्या विवाह घोषणापत्रात जोडलेल्या निवासी दाखल्यातही तोच अनुक्रमांक सापडला. याची चौकशी केली असता त्याने विवाह नोंदणीसाठी 'कॉमन सर्व्हिस सेंटर'वर ऑनलाईन अर्ज केला होता व हे सेंटर रणजीत भोसले चालवत असल्याचे दिसून आले आहे. वरील कृती भारतीय दंड संहितेनुसार बनावटगिरी असून, त्याचसाठी आपण बोगस निवासी दाखले, कागदपत्रे तयार करणाऱ्यांविरुद्ध तक्रार नोंदवत असल्याचे म्हटले आहे. हे बनावट निवासी दाखले सासष्टी तालुका मामलेदारांच्या नावे तयार करण्यात आले आहेत. बोगस दाखले तयार करण्यात गुंतलेल्यांविरुद्ध गुन्हा नोंदवून याप्रकरणाचा सखोल तपास करून आरोपपत्र दाखल करावे, अशी मागणी फातोर्डा पोलिस ठाण्यात नोंदवलेल्या तक्रारीतून करण्यात आली आहे. तक्रारी सोबत बनावटगिरीसंदर्भातील सर्व कागदपत्रे, दस्तऐवज जोडले असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

'स्पीड गव्हर्नर'बसवण्यासाठी ७ एप्रिलची अंतिम मुदत

जाणार आहे. रेंट–ए–कार मालकांनी देखील एसओपी चे पालन करणे अपेक्षित असून एसओपीनुसार त्यांना वाहने अनुभवी चालकांनाच द्यावी लागतात. पण बरेचसे ऑपरेटर वाहने कोणालाही देतात. त्यामुळे आपघातांची शक्यता वाढते. रेंट–ए–कॅबच्या पार्किंगसाठी पुरेशी जागा उपलब्ध करून देणे ही वाहनधारकांची जबाबदारी आहे. वसाहती आणि घरांच्या प्रवेशद्वारांवर वाहने उभी केली जात असल्याचे निदर्शनास येत असून आशा वाहनचालकांवर कडक कारवाई केली जणार असल्याचे वाहतूकमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे.

जेझुस अकादमी स्कूलचे कार्यालय फोडून ७५ हजारांचा ऐवज लंपास

■ टीम दैनिक हेराल्ड

वास्को, दि.७ : वेळसांव येथील इंफंट जेझुस अकादमी स्कूलचे कार्यालय फोडून अज्ञात चोरट्याने ३० हजार रुपये रोख व ३५ हजार रुपयांचे डी व्हीआर उपकरणे असा ७५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. याप्रकरणी वेर्णा पोलिस स्थानकात तक्रार करण्यात आली आहे. चोरट्यांनी आता विद्यालयांना लक्ष्य करण्याचे सत्र आरंभल्याने विद्यालय प्रमुखांनी चिंता व्यक्त केली आहे. ज्या विद्यालयांमध्ये सुरक्षा रक्षक नाही, तेथे सरकारने योग्य तोडगा काढण्याची मागणी करण्यात आली आहे.

गेल्या आठवड्यात मांगोरहिलच्या सेंट टेरेझा हायस्कूलचे कार्यालय फोडण्यात आले होते. त्यानंतर आता इंफंट जेझुस अकादमी स्कूलचे कार्यालय फोडण्यात आले. चोरटे चोरी केल्यावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे डीव्हीआर आपल्या समावेत नेत असल्याने चोरट्यांचा शोध घेणे पोलिसांना आव्हान ठरू लागले आहे. इंफंट जेझुस अकादमी स्कूलचे मुख्य गेटचे कुलुप तोडल्यावर कार्यालयाचे दोन्ही कुलुप तोडण्यात आली. चोरट्यांनी कार्यालयात असलेले डोनेशन पेटी फोडून त्यातील रोकड नेली. त्यामध्ये असलेली नाणी मात्र त्यांनी तशीच सोडली. तसेच १६ चॅनेल असलेले डीव्हीआर पळविले. प्राथमिक विद्यालयासाठी लावण्यात येणाऱ्या कॅमेऱ्यांचे डीव्हीआर मात्र त्यांनी तसाच ठेवला. कार्यालयातील कपाटे फोडून त्यातील वस्तू इतरत्र टाकण्यात आली. इतर वस्तूंची मोडतोड करण्यात आली. गुरुवारी सकाळी विद्यालयाचा शिपाई शाळेचे गेट उघडण्यासाठी आला असता त्याच्या नजरेज चोरीचा प्रकार आला. या चोरीप्रकरणी वेर्णा पोलिस पुढील तपास करीत आहेत.

राज्यपालांतर्फे १४४ कर्करोग रुग्णांना आर्थिक सहाय्य

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ७ : कर्करोगग्रस्त रुग्ण आपल्या आजारावर मात करू शकतात. परंतु, त्यासाठी वेळेवर उपचार घेणे आवश्यक असतात. त्यांनी आरोग्याची काळजी घेतली तर ८० टक्के कर्करोगावर मात करू शकतात. कर्करोगावर मात करण्यासाठी आज अनेक आधुनिक उपचारपद्धती उपलब्ध असल्याची माहिती राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई यांनी दिली.

राज्यपाल निधीमार्फत गुरुवारी राजभवनवर राज्यपालांचे सचिव एम. आर. एम. राव तसेच अतिरिक्त सचिव संजीव गावस देसाई यांच्या उपस्थितीत राज्यपालांच्याहस्ते १४४ कर्करोग रुग्णांना आर्थिक सहाय्य दिले. कर्करोग उपचार करण्यासाठी लाखो रुपये खर्च येतात. यासाठी त्यांना आर्थिक तसेच मानसिक आधाराचीही गरज असते. समाजिक भान म्हणून राजभवनतर्फे कर्करोग रुग्ण तसेच किडनी खराब झालेल्या रुग्णांना आर्थिक सहाय्य देण्यात येते. या लोकांना आर्थिक पाठिंबा मिळावा हाच या मागचा मुख्य हेतू असल्याचे राज्यपालांनी स्पष्ट केले.

दोनापावल : राज्यपाल निधीमार्फत कॅन्सरग्रस्त रुग्णांना आर्थिक सहाय्य करताना राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई व इतर.

सचिव एम. आर. एम. राव म्हणाले की, राजभवनतर्फे आता दिव्यांगाना आणि कर्करोग व किडनीच्या आजाराने पीडित तसेच अन्य विविध गरजूंना आर्थिक सहाय्य दिले जाते. राज्यपालांनी अनेक समाजाभिमुख उपक्रम राबविले आहेत.

फोंड्यात अल्पवयीन मुलीचे अपहरण

■ टीम दैनिक हेराल्ड

फोंडा, दि. ७ : फोंडा परिसरातील एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याचा गुन्हा बुधवारी रात्री फोंडा पोलीस स्थानकात दाखल करण्यात आला आहे. अल्पवयीन मुलीच्या आईने फोंडा पोलिस स्थानकात अपहरण केल्याची तक्रार दिल्यानंतर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. निरीक्षक तुषार लोटलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक आदित्य नाईक गावकर तपास करीत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दि. ५ मार्च रोजी दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास अपहरण केल्याची तक्रार तिच्या आईने फोंडा पोलिस स्थानकात दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

सिंधुदुर्गात 'सूर्य घर मोफत वीज'साठी सर्व्हेक्षण

■ टीम दैनिक हेराल्ड

- टपाल विभागाकडे जबाबदारी
- दीड हजार जणांकडून नोंदणी

ओरोस, दि. ७ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान 'सूर्य घर मोफत वीज योजना'ची घोषणा केली आहे. या योजनेसाठी सर्व्हेक्षणाचे काम भारतीय टपाल विभागाकडे देण्यात आले आहे. या योजनेमध्ये मोफत नाव नोंदणीसाठी जिल्ह्यातील सर्व पोस्टमन व ग्रामीण टपाल सेवक सज्ज झाले आहेत. सर्व्हेक्षणाचे काम सुरू झाले असून १४७४ नागरिकांनी आतापर्यंत नोंदणी केली आहे.

पीएम सूर्यघर ॲपवर पोस्टमनमार्फत यांची नावनोंदणी केली जाणार आहे. सौर उर्जेचे सयंत्र बसविण्यासाठी केंद्रामार्फत अनुदान देखील दिले जाणार आहे. केंद्राने पंतप्रधान सूर्य घर मोफत वीज योजनेची या महत्वाकांक्षी योजनेची घोषणा केली असून या योजनेच्या माहितीचा जनजागर करीत सर्व्हेक्षणाची महत्वपूर्ण जबाबदारी भारतीय टपाल खात्याकडे अर्थात पोस्ट खात्याकडे सोपविली आहे. सर्व्हेक्षणासाठी पीएम सूर्यघर ॲप विकसित करण्यात आले आहे. याच ॲपवर घरोघरी जाऊन पोस्टमन व ग्रामीण डाक सेवक ऑनलाईन सर्व्हेक्षणाचे काम करत आहेत. देशभरात १ कोटी घरांमध्ये पीएम सूर्यघर योजना पोचविण्याचे उद्दिष्ट केंद्राकडून निश्चित केले आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना ३०० युनिट्सपर्यंत मोफत वीजेचा लाभ मिळणार असुन सबसिडी स्वरूपात सोलार पॅनल उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

केंद्राच्या माध्यमातून उत्तर गोव्यात १२५० प्रकल्प

केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक : दोन्ही जागा जिंकणार असल्याचा दावा

■ टीम दैनिक हेराल्ड

फोंडा, दि. ७ : केंद्र सरकारच्या माध्यमातून उत्तर गोव्यात १२५० प्रकल्प पूर्ण करण्यात आले आहेत. त्यामुळे लोकसभा निवडणुकीसाठी आपली पुन्हा उमेदवार पदासाठी निवड करण्यात आली. केंद्र तसेच राज्य सरकारच्या सहकार्याने गोव्यातील दोन्ही जागा भाजप उमेदवार जिंकणार असल्याचा

विश्वास केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांनी व्यक्त केला..

वस्तवाडा–आडपई येथे बांधकाम, जलस्रोत व वीज खात्यातर्फे विकासकामाच्या शुभारंभप्रसंगी केंद्रीय मंत्री नाईक बोलत होते. त्यावेळी वीज मंत्री सुदिन ढवळीकर, जलस्रोत खात्याचे मंत्री सुभाष शिरोडकर, जिल्हा पंचायत सदस्य गणपत नाईक, सरपंच चंदन नाईक, पंच क्षिप्रा आडपईकर, माजी मंत्री मिलिंद नाईक व अन्य मान्यवर उपस्थित होते.

विरोधक विनाकारण आरोप करीत असतात. विकासकामाची वस्तुस्थिती पाहून विरोधकांनी टीका करण्याची गरज आहे. सरकार लोकांच्या मागण्या पूर्ण करताना अनेक विकासकामांना चालना देत आहे. येत्या लोकसभा निवडणुकीत भाजपचे दोन्ही उमेदवार भरघोस मतांनी विजयी होणार असल्याचे केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांनी सांगितले.

आडपई : वस्तवाडा येथे कार्यक्रमात दीपप्रज्वलीत करताना केंद्रीय राज्य मंत्री श्रीपाद नाईक व इतर.

वीज मंत्री सुदिन ढवळीकर म्हणाले, की गेल्या काही महिन्यांपासून मडकई मतदारसंघात हॉटमिक्स डांबरीकरण, भूमिगत वीजवाहिन्या तसेच अन्य

विकासकामांना सुरुवात झाली आहे. मतदारसंघातील सर्व ६ पंचायत क्षेत्रातील पंचायतीमध्ये आणखी विकासकामे सुरू करण्यात येतील.

फोंडा तालुक्याला प्रथमच सर्व ४ आमदारांना मंत्रिमंडळात स्थान मिळाले आहे. त्यामुळे तालुक्यात झपाट्याने विकासकामे सुरु असल्याचे दिसून येत असल्याचे जलस्रोत खात्याचे मंत्री सुभाष शिरोडकर यांनी सांगितले.

'गिव्हिंग विंग्स टू ड्रीम्स' ने एंजल जॉय सन्मानित

- मनोहर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या मुकुटात आणखी एक तुरा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ७ : मोपा येथील मनोहर आंतरराष्ट्रीय विमानतळावरील एंजल जॉय यांना गिव्हिंग विंग्स टू ड्रीम्स अवॉर्ड्स २०२३ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. विमानतळावर वन्यजीव धोक्याच्या व्यवस्थापनाची काळजी घेणारी भारताची पहिली महिला म्हणून त्यांचा सन्मान करण्यात आला आहे. या पुरस्काराने मनोहर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या मुकुटात आणखी एक तुरा खोवला. केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि रस्ते वाहतूक आणि महामार्ग राज्यमंत्री जनरल (डॉ.) व्ही.के. सिंग यांच्याहस्ते दिल्लीत झालेल्या एका खास समारंभात हा पुरस्कार एंजल जॉय यांना प्रदान करण्यात आला.

वाइल्ड लाइफ हॅझर्ड मॅनेजमेंट ही विमानतळ ऑपरेशन सुरक्षेचा एक महत्त्वाचा पैलू असून पारंपरिकपणे पुरुष–प्रधान काम आहे व त्यात शारीरिक श्रम आणि एअरसाइड आणि आसपासच्या वातावरणाची सतत तपासणी समाविष्ट आहे. एंजल जॉय या पक्षीविज्ञान आणि टाइम सिरीज बर्ड डेटा नालिसिस या विषयातील तज्ज्ञ असून मोप येथील विमानतळावर रुजू होण्यापूर्वी तिने विविध भारतीय विमानतळांवर वन्यजीव धोक्याचा अभ्यास करून संशोधन जीवशास्त्रज्ञ म्हणून तिच्या कारकिर्दीची सुरुवात केली. जीएमआयआरचे सीईओ आर. व्ही. शेषन यांनी याबाबत सांगितले की, आमच्या कंपनीत २० टक्के महिला काम करीत असून आम्ही एंजल जॉय यांचे अभिनंदन करीत आहोत. आमच्या कंपनीसाठी हा पुरस्कार फार मोलाचा आहे.

दुचाकीची बॅटरी चोरीप्रकरणी एकास अटक

■ टीम दैनिक हेराल्ड

वास्को, दि. ७ : इलेक्ट्रिक दुचाकीची बॅटरी चोरीप्रकरणी मुरगाव पोलिसांनी अट्टल चोरटा विनायक वसंत राणे(२१) याला अटक केली. त्याने चोरलेली सदर बॅटरी पोलिसांनी हस्तगत केली आहे.

दुस्तेरो येथील कुलासो आर्केड इमारतीत राहणारे अमन सिंग यांनी आपली इलेक्ट्रीक दुचाकी इमारतीच्या आवारात रात्री उभी केली होती. या दुचाकीची बॅटरी कोणी चोरल्याप्रकरणी त्यांनी बुधवारी रोजी मुरगाव पोलिस स्थानकात तक्रार केली होती. या दखल तक्रारीची दखल घेऊन मुरगाव पोलिसांनी तपास सुरु केल्यावर विनायक हाती लागला. याप्रकरणी मुरगाव पोलिस अधिक तपास करीत आहेत.

हेलकावे पूर्ण वातावरणात निर्देशांकात थोडीशी भर!

■ टीम दैनिक हेराल्ड

मुंबई, दि.७ : गुरुवारच्या सत्रामध्ये भारतीय शेअर बाजारांवर सकारात्मक वातावरण राहिले. मात्र, सप्ताहातील ऑप्शनच्या व्यवहारांची पूर्तता होणार असल्याने बाजारात खूप हेलकावे पूर्ण वातावरण राहिले. निफ्टीने या सत्रात २२ हजार ५०० अंशांची नवीन उच्चांकी पातळी नोंदवली. या सत्रात प्रसारमाध्यम कंपन्या, धातू कंपन्या व एफएमसीजी कंपन्यांमध्ये जोरदार मागणी होती. सत्राच्या अखेरीस मुंबई शेअर निर्देशांकात ३३ अंशांची भर पडली तर निफ्टी मध्ये वीस अंशांची भर पडलेली होती या क्षेत्रात टाटा मोटर्ससह बजाज फायनान्स व आयटीसी यांच्यात सर्वाधिक भाव वाढ झाली.

मुंबई शेअर निर्देशांक या सत्रात ७४ हजार २४२.७४ अंश पातळीवर खुला झाला. दिवसभरात त्याने ७४ हजार २४५.१७ अंशांची उच्चांकी पातळी गाठली तर याच सत्रात त्याने ७३ हजार ९२१.४८ अंशांची निचांकी पातळी नोंदवली. कालच्या सत्राच्या तुलनेत त्यात ३३.४० अंशांची मध्यम वाढ होऊन तो दिवसअखेरीस ७४ हजार ११९.३९ अंश पातळीवर बंद झालेला होता. राष्ट्रीय शेअर बाजारावरील ५० प्रमुख कंपन्यांवर आधारलेला निफ्टी या सत्रात २२ हजार ५०५.३० अंश पातळीवर खुला झाला. त्याने दिवसभरात २२ हजार ५२५.६५ अंशांची उच्चांकी तर २२ हजार ४३० अंशांची निचांकी पातळी नोंदवली. या सत्रात त्यात १९.५० अंशांची थोडी वाढ होऊन तो अखेरीस २२ हजार ४९३.५५ अंश पातळीवर बंद झालेला होता.

बुल ॲंड बेअर
प्रा. नंदकुमार काकिडे

अ गटामध्ये या सत्रामध्ये एकूण ७०९ कंपन्यांमध्ये व्यवहार झाले. त्यापैकी ४२८ कंपन्यांची भाव पातळी वर गेली २७७ खाली गेली. त्याचप्रमाणे या सत्रात एकूण ३९२२ व्यवहार झाले. त्यापैकी २०७७ कंपन्यांचे भाव वर गेले तर १७३२ झालेली होती. मात्र, या सत्रात ११३ कंपन्यांची भाव पातळी स्थिर होती.

या सत्रात अ गटातील ०.०३ टक्के ३.९० टक्के भाववाढ टाटा स्टील, टाटा मोटर्स व बजाज फायनान्स यांच्यात झाली. तसेच या गटातील ०.०२ ते ३.६८ घसरण महेंद्र आणि महेंद्र, रिलायन्स व मारुती यांच्यात झाली. या सत्रातील सर्वाधिक व्यवहार महेंद्र आणि महेंद्रमध्ये झाले. त्याच्या ९ लाख ४३ हजार ६५८ शेअर्समध्ये १८०.०६ कोटी रुपयांची उलाढाल झाली. या कंपनीचा या सत्रातील सर्वाधिक उच्चांकी भाव १९३२.२५ रुपये होता तर १८८५ रुपयांची निचांकी पातळी नोंदवली होती. त्या खालोखाल भारती एअरटेलमध्ये १४४.३२ कोटी रुपये व एचडीएफसी बँकमध्ये ११९.१२ कोटी रुपयांचे व्यवहार झाले.

पाहिजेत

An oppurtunity in becoming your own boss work from home, earn supplemental income, training and support provided. detail call: 9324646579.

सहवेदना

प्रियवंदा देसाई

■ टीम दैनिक हेराल्ड

आगोंद, दि. ७ : आगोंद, देसाईवाडा येथील माजी सरपंच स्व. गोविंद वै. देसाई यांच्या पत्नी प्रियवंदा देसाई (८१) यांचे वास्को येथे हृदयविकाराच्या झटक्याने बुधवारी रात्री निधन झाले. गुरुवारी आगोंद येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे, विवाहित पुत्र नितीन, नितेश, निलेश, नरेश, निवृत्ती, सुना, विवाहित कन्या नमिता, जावई, नातवंडे असा परिवार आहे.